**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सूर्यकांत रायप्पा व्हनकडे
हिवळे, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००८ |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.१२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ०.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२०.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीला सर्व पक्षकार गैरहजर होते.

आपण मागणी केलेली माहिती मोघम असल्याच्या कारणावरून जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दिली नाही व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांचा  निर्णय योग्य ठरविला, म्हणून अपीलकर्ता श्री.सूर्यकांत रायप्पा व्हनकडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.व्हनकडे यांनी सुमारे २६ वर्षांच्या कालावधीतील सरसकट माहिती मागितली आहे. विशिष्ट शाळांची माहिती मागितल्यास माहिती देता येईल, असे त्यांना कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात केले. श्री.व्हनकडे यांचा अर्ज पाहता विस्तृत स्वरूपाची व सरसकट पध्दतीने माहिती मागितली आहे. हे लक्षात घेता त्यांनी अभिलेखाचे अवलोकन करून आवश्यक ती माहिती प्राप्त करून घेणे उचित ठरेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२१.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. आनंद सायबू क्षीरसागर — अपीलकर्ता
भारती विद्यापीठ, सुशिल नगर, घर नं.६७,
विजापूर रोड, सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशाला,
सेटलमेंट, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०.११.२००८ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशाला, सेटलमेंट, सोलापूर श्री. व्ही. एल. गायकवाड | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.८.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशाला, सेटलमेंट, सोलापूर या शाळेत आपण सन १९९८ ते २००० या काळात शिक्षक म्हणून काम केले, परंतु हजेरी पटावर आपल्याला शिपाई म्हणून दाखविले. त्यानंतर प्रयोगशाळा पर्यवेक्षक म्हणून हजेरी पटावर आपल्याला दाखविले. आपल्यानंतर

आलेल्या श्री. साहेबराव शिंदे यांची सन १९९७ मध्ये शिक्षक म्हणून नोंद दाखविली. शिक्षण अधिकाऱ्यांनी श्री. शिंदे यांची मान्यता रद्द केली. या सर्व संदर्भातील माहिती आपण मागितली होती. उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी ही माहिती देण्याच्या सूचना प्रशाळेच्या मुख्याध्यापकांना दिल्या. त्यांनी माहिती न दिल्यामुळे आपण अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील केले. शुल्क आकारून माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी यांनी दिला, परंतु मुख्याध्यापकांनी शुल्क स्वीकारले नाही, म्हणून आपण मनीऑर्डर अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या नावे केली. त्यांनी ती स्वीकारली नाही, म्हणून मुख्याध्यापकांच्या नावे मनी ऑर्डर केली. त्यांनीही ती स्वीकारली नाही. त्यानंतर मुख्याध्यापकांनी आपल्याला चुकीची तीन स्मरणपत्रे पाठवून माहिती नेण्यास कळविले व त्यानंतर शुल्क स्वीकारून चुकीची व अपुरी माहिती दिली. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी आपल्याला १५४ पानांची माहिती दिली, तीही चुकीची आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. आनंद सायबू क्षीरसागर यांनी केले.

श्री. क्षीरसागर यांनी शुल्क भरले नाही. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे मनीऑर्डर आलेली नाही, त्यामुळे माहिती देण्याचा प्रश्न नव्हता. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दिलेल्या आदेशानुसार सन १९९५ पासूनची सर्व माहिती दिली. प्रारंभापासून श्री. क्षीरसागर यांना प्रयोगशाळा परिचर म्हणूनच संस्थेने नेमलेले असून त्यांनी वेळोवेळी विविध अधिकारी व संघटना यांच्याकडे तक्रारी, पत्रव्यवहार केला, त्या त्या ठिकाणी संस्थेने वस्तुस्थिती स्पष्ट केली. त्यांच्या तक्रारीत तथ्य नसल्याचा अहवाल एक सदस्य समिती व त्रिसदस्य समिती यांनी दिला. शाळा न्यायाधिकरण, पुणे विभाग, सोलापूर यांनी त्यांचा अर्ज दोन वेळा फेटाळला आहे व त्यात त्यांना १०००/- रूपये दंड झालेला आहे. संस्थेतील काम नीट न करता प्रशाळेला व संस्थेला ते नाहक त्रास देत आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशाला, सेटलमेंट, सोलापूर श्री. व्ही. एल. गायकवाड यांनी केले. श्री. क्षीरसागर यांनी केलेले विविध अर्ज, वेळोवेळी त्यांना दिलेली उत्तरे आदींबाबतची पूरक कागदपत्रे श्री. गायकवाड यांनी सादर केली.

उभय बाजूंची निवेदन व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहाता श्री. क्षीरसागर यांना माहिती देण्यात आली आहे. त्यांच्या अन्य तक्रारी व आरोप माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दखल घेण्यायोग्य नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २२.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. अशोक उमाजीराव मदने
मु. वडी, पो. कळंबी, ता. खटाव, जि.सातारा — **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
वडी हायस्कूल, वडी, ता. खटाव, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३२ + १३३ /सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. अशोक उमाजीराव मदने
मु. वडी, पो. कळंबी, ता. खटाव, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सातारा तर्फे प्रतिनिधी श्री. के.टी.ढाळे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
वडी हायस्कूल, वडी, ता. खटाव, जि. सातारा श्री. एस.एस. देशमुख

| अपील क्रमांक | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १३२ / सातारा | दि. ७.८.२००६ | -- | दि. १९.९.२००६ | -- |
| १३३ / सातारा | दि. १९.९.२००६ | -- | दि. १७.१०.२००६ | |

माहिती -मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

सन १९९४-१९९५ या शैक्षणिक वर्षात तीन तुकड्या कमी झाल्यामुळे अतिरिक्त ठरविलेल्या शिक्षकांची यादी, सेवा ज्येष्ठता यादी आदी माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. अशोक उमाजीराव मदने यांनी केली.

संस्थेच्या सहा प्रशाला आहेत. प्रशालेतील तीन तुकड्या कमी झाल्या तरी संस्थेतील शिक्षक अतिरिक्त ठरत नाहीत. याबाबतचा तपशील, समायोजन आदेशाच्या प्रती, संस्थेकडून प्राप्त झालेल्या सेवाज्येष्ठता यादीची प्रत आदी माहिती श्री. मदने यांना दिली आहे. अपील क्र.१३३ मध्ये त्यांनी प्रश्न विचारले असून अनेक बाबींचा खुलासा मागितला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अशा प्रकारची विचारणा करता येत नसूनही संस्थेकडून माहिती घेऊन हा खुलासा करण्यात आला, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, वडी हायस्कूल, वडी, ता. खटाव श्री. एस.एस. देशमुख यांनी केले. श्री. मदने यांनी अशा स्वरुपाची माहिती मागणारे पंधरा अर्ज केले आहेत. अंदाजे शुल्क कळविले होते, त्यापेक्षा जास्त खर्च येऊनही तो त्यांच्याकडून घेतलेला नाही, असे जन माहिती अधिकारी श्री. देशमुख यांनी नमूद केले.

सेवेत कनिष्ठ असलेल्या शिक्षकांना अतिरिक्त ठरविले जाते. परंतु प्रशालेवर शिक्षक अतिरिक्त न ठरविले जाता, संस्थेच्या पातळीवर विचार केला जातो. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सातारा यांचे प्रतिनिधी श्री. के.टी. ढहाळे यांनी नमूद केले.

एकाच माहितीसाठी १५-१५ अर्ज करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये खुलासा, भाष्य याची मागणी करता येत नाही. देण्यात आलेल्या माहितीची प्रत जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाला सादर केली. ती पाहता अपीलकर्त्यास माहिती नाकारण्याचा जन माहिती अधिकाऱ्यांचा उद्देश दिसून येत नाही. तथापि माहिती अपुरी असल्याच्या अपीलकर्त्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सातारा यांनी आठ दिवसांत शहानिशा करुन आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. १५.१२.२००८ रोजी उभय बाजूंना एकत्र बोलावून शहानिशा करण्यात आली व श्री. मदने यांना अपेक्षित असलेली ऊर्वरित माहिती देण्याच्या सूचना जन माहिती अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती पाठवून

त्याची प्रत आपल्या कार्यालयास सादर केली, असा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सातारा श्री. उदयसिंह भोसले यांनी दि. २०.१२.२००८ च्या पत्रान्वये आयोगास सादर केला. मात्र मागणीनुसार आपल्याला माहिती मिळाली नसल्याची तक्रार श्री. मदने यांनी दि. १७, १८-१२-२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगाकडे केली. श्री. मदने यांना पाठविलेली माहिती रजिस्टर्ड टपालाने दि. १८.१२.२००८ राजी पाठविण्यात आली. परंतु ती त्यांनी स्वीकारण्यास नकार दिल्यामुळे परत आल्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, वडी हायस्कूल वडी, ता.खटाव, जि. सातारा श्री. एस.एस.देशमुख यांनी दि. २९.१२.२००८ च्या पत्रान्वये आयोगास कळविले. या बाबी लक्षात घेता श्री. मदने यांच्या तक्रारीची दखल घेणे आवश्यक नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ११ .१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुधीर धोंडीबा लडकत
९११, भवानी पेठ पेठ, पुणे-२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मावळ, ता. मावळ, जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ, ता. मावळ, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३२३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.४.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** — श्री. सुधीर धोंडीबा लडकत, ९११, भवानी पेठ पेठ, पुणे-२

**अपिलीय प्राधिकारी** तथा — तहसीलदार, मावळ, ता. मावळ, जि. सातारा, श्री. सचिन बारवकर

**जन माहिती अधिकारी** तथा — निवासी नायब तहसीलदार, मावळ, ता. मावळ, जि. सातारा श्री. चंद्रकांत जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

तळेगाव दाभाडे येथील स्वस्त धान्य दुकानदार श्री. बबन बळवंत भेगडे यांच्या उत्पन्न दाखल्याच्या संदर्भात, व त्यांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या नावावरील जमिनीचे ८-अ व ७/१२ चे उतारे याची माहिती अपूर्ण व विलंबाने दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. सुधीर धोंडीबा लडकत यांनी केली.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ यांनी काही माहिती श्री. लडकत यांना दिली आहे. श्री. बबन बळवंत भेगडे या एकाच व्यक्तीच्या संदर्भात विविध स्वरूपाची माहिती मागणारे अर्ज श्री. लडकत करीत असतात. त्रयस्थ व्यक्तीच्या जमिनीचे ७/१२ उतारे आदी स्वरूपाची व्यक्तिगत माहिती त्यांनी मागितली असून वेळोवेळी त्यांना माहिती देण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ श्री. सचिन बारवकर यांनी केले. आपण यापूर्वी तीन अपिले (क्र.५३२/२००९/पुणे, २९१६/पुणे व २६९/२००९/पुणे) केली असून त्याबाबतची परिपूर्ण माहिती दिली नाही, असेही प्रतिपादन श्री. लडकत यांनी केले.

श्री. लडकत एकाच व्यक्तीबाबत विविध स्वरूपाचे अर्ज करून व्यक्तिगत उत्पन्नाच्या दाखल्यापासून जमिनीच्या उताऱ्यापर्यंत अनेक प्रकारची माहिती मागत आहेत. अशाच स्वरूपाची त्यांची तीन अपिले (क्र.५३२/२००९/पुणे, २९१६/पुणे व २६९/२००९/पुणे ) आयोगाने यापूर्वी निकाली काढलीआहेत.

श्री. लडकत यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार देय ठरणारी व द्यावयाची राहिलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ यांनी एक आठवड्यात द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तसेच केवळ व्यक्तिगत वादाच्या संदर्भातून त्रयस्थ पक्षाची खाजगी माहिती मागणारे अर्ज व अपिले सातत्याने करणे हा माहितीच्या अधिकाराचा योग्य वापर नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाच्या आदेशानुसार ऊर्वरित माहिती आपल्याला मिळाली नसल्याची तक्रार श्री. लडकत यांनी दि. १९.५.२००९ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. त्याबाबत आयोगाने दि. १७.७.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ यांच्याकडून खुलासा मागविला. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ श्री. किशोर घाडगे यांनी दि. १०.८.२००९ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला असून श्री. भेगडे यांच्या नावावरील

जमिनीच्या ८-अ व ७/१२ उताऱ्यासह सर्व माहिती त्या त्या मुदतीत श्री. लडकत यांना देण्यात आली असल्याचे व काही माहिती दि. २.७.२००९ व दि. ७.८.२००९ रोजी देण्यात आल्याचे आयोगास अवगत केले. लोकसभा व विधानसभा निवडणुका आदींचा संदर्भ लक्षात घेता विलंब क्षमापित करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २१.१२.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. अच्युतराव देवराव कांबळे
मु.पो.बावडा, ता. इंदापूर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे-११ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे-११

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३३३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१०.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. अच्युतराव देवराव कांबळे
मु.पो.बावडा, ता. इंदापूर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे-११ तर्फे प्रतिनिधी श्री. भा.रा.बोकडे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे-११ श्री. एस.डी. चोपडे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३.४.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.६.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.६.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेली माहिती अपुरी व विलंबाने देण्यात आल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. अच्युतराव देवराव कांबळे यांनी केली.

श्री. कांबळे यांनी अर्जासोबत दारिद्र्य रेषेखालील दाखला दिलेला नव्हता. तो उशिरा दिला, तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार तीस दिवसांच्या विहित मुदतीत माहिती देता न आल्यामुळे निःशुल्क दिली, मात्र श्री. कांबळे यांची मूळ तक्रार शेतकऱ्यांना पाणी पुरवठा करण्यासंबंधीची असून अर्ज करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना पाणी देण्यात आले आहे, असे निवेदन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग श्री. एस.डी.चोपडे यांनी केले.

श्री. कांबळे यांनी तत्कालीन शाखा अधिकारी, पाटबंधारे कार्यालय, बावडा, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. पी.डी. शिंदे यांच्याविरूध्द विविध स्वरूपाच्या तक्रारी केल्या असून त्या अनुषंगाने माहिती मागितली होती. माहिती-मागणीचा अर्ज त्यांनी दि. २३.४.२००७ रोजी केला. माहिती संकलित करण्यात येत असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना दि. २७.३.२००७ रोजी कळविले. सहाय्यक अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती दि.२२.५.२००७ रोजी देण्यात आली. काही माहिती उप कार्यकारी अभियंता,पुणे पाटबंधारे विभाग, पुणे यांनी दि. १४.६.२००७ रोजी संपूर्ण माहिती दि. १४.६.२००८ रोजी दिली, व तत्कालीन शाखा अधिकारी श्री. पी.डी. शिंदे यांनी त्यांच्या संदर्भातील कामाची दैनंदिनी इ. माहिती विहित मुदतीत दिली नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, आणि अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग यांनी आयोगाला सादर केलेल्या अहवालांवरून स्पष्ट होते. श्री. पी.डी. शिंदे यांना या संदर्भात दि. ९.५.२००७, दि. १४.५.२००७, दि. २४.५.२००८ व दि. ५.६.२००८ या तारखांना वरिष्ठांनी वारंवार कळवूनही त्यांनी माहिती दिली नाही. श्री. शिंदे यांना विलंबास वैयक्तिक जबाबदार धरून शिस्तभंगाची कारवाई का करू नये, याबाबतची नोटीस उपविभागीय अभियंता, बारामती पाटबंधारे उपविभाग, बारामती यांनी दिली होती. तथापि श्री. शिंदे यांनी आपली दैनंदिनी सादर करण्यासारख्या बाबींची पूर्तता विहित मुदतीत केली नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून स्पष्टपणे दिसून येते.

श्री. कांबळे यांनी मूळ अर्जात विस्तृत भाष्य केले असून श्री. शिंदे यांच्याविरूध्द अनेक तक्रारी केल्या आहेत. तसेच या तक्रारींच्या अनुषंगाने अपेक्षित असलेल्या प्रशासकीय कार्यवाहीचा उल्लेख करून खुलासा अथवा स्पष्टीकरण मागितले आहे. अशा प्रकारची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती' ठरत नाही. तथापि श्री. शिंदे यांची दैनंदिनी आदीची माहिती त्यांना विहित मुदतीत दिली गेलेली नाही व त्याला श्री. शिंदे जबाबदार असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून दिसते. या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांनी आठ दिवसांत सविस्तर अहवाल आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे श्री. स. द. चोपडे यांनी दि. २७.१०.२००८ च्या पत्रान्वये पूरक कागदपत्रांसह सविस्तर अहवाल सादर केला. श्री. शिंदे यांना पाण्यासाठी प्राप्त झालेले अर्ज, पंचनामे आदींबाबत कसलीही कसूर केलेली नाही. श्री. कांबळे यांनी त्यांच्याविरुध्द तक्रारीचे मोघम अर्ज केले आहेत, असे उपविभागीय अभियंता, बारामती यांनी कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे, पुणे श्री. स.द.चोपडे यांना सादर केलेल्या पत्रात नमूद केले आहे. 'श्री. पी.डी.शिंदे सन २००६-०७ साठी बावडा शाखेत रू.२३.९१ लक्ष चे पाणी पट्टीचे वसुलीचे उद्दिष्ठ देण्यात आले होते. शाखाधिकारी म्हणून श्री. शिंदे यांनी कार्यभार दि. १.११.२००६ रोजी स्वीकारलेला आहे, त्यापूर्वी शाखेअंतर्गत पाणीपट्टी वसुली रू. ४.७९ लक्ष जमा होती. श्री. शिंदे यांनी १.११.२००६ ते दि. ३१.३.२००७ या पाच महिन्यांच्या कालावधीत रक्कम रू. १७.०२ लक्ष इतकी पाणीपट्टी वसुली केलेली आहे. शाखे अंतर्गत एकुण ९१.१० % झालेल्या वसुलीपैकी ७१.२० % वसुली श्री. शिंदे यांनी केलेली आहे,' असे या अहवालात म्हटले आहे. तथापि माहिती विहित मुदतीत न देण्याबाबतचा कोणताही खुलासा त्यात नाही.

अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांनी दि. ३.११.२००८ च्या पत्रान्वये सविस्तर अहवाल सादर केला. 'कालव्यावरील सिंचन व पाणीपट्टी वसुली यासाठी दिवस-रात्र कार्यक्षेत्रावर फिरावे लागल्यामुळे व रब्बी हंगामात नमूद नं.७ चे उभ्या पिकांचे प्राप्त झालेले अर्ज यांची छाननी व प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर पिकनिहाय मोजणी पूर्ण झाल्याशिवाय अर्जदाराला माहिती देणे शक्य नव्हते. यामध्ये अर्जदाराला श्री. शिंदे यांनी विहित कालावधीत अचूक माहिती देता येणे शक्य नसलेबाबत कळविणे आवश्यक होते. परंतु क्षेत्रिय

कामाचा व्याप पहाता ते त्यांना शक्य झालेले दिसत नाही,' असा खुलासा त्यांनी केला आहे. व माहिती दिली असल्याने दंडात्मक कारवाई करू नये, अशी विनंती केली आहे.

या बाबी लक्षात घेतल्या तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांचा पत्रव्यवहार लक्षात घेता वारंवार स्मरणपत्र व बिनतारी संदेश पाठवूनही श्री. शिंदे यांनी दि. ५.६.२००८ पर्यंत मुद्देनिहाय संपूर्ण माहिती पाठविलेली नसल्यामुळे अपीलकर्त्यास पूर्ण माहिती एक वर्षाहून अधिक विलंबाने देण्यात आल्याचे स्पष्ट होते. श्री. शिंदे यांनी त्यांच्याकडील माहिती मर्यादित कालावधीत देणे आवश्यक होते, ते त्यांनी केलेले नाही. त्यामुळे विलंबास ते जबाबदार असून शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. तत्कालीन शाखा अधिकारी, पाटबंधारे कार्यालय, बावडा, ता. इंदापूर, जि. पुणे श्री. पी.डी. शिंदे यांना रू. २५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. शास्तीची रक्कम संबंधितांच्या जानेवारी २०१० व फेब्रुवारी २०१० च्या अनुक्रमे फेब्रुवारी २०१० व मार्च २०१० मध्ये देय असलेल्या वेतनातून दोन समान हप्त्यात कपात करून ००७०, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१) या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांनी करावी, व तसा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३१.१२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. शिवाजी बबनराव खेडकर
मु.पो.रांजणगाव गणपती, ता.शिरुर,जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** रजा राखीव उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय (कुळकायदा शाखा), पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** अप्पर चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३३४/२००९ + १३३५/२००९ व १३३६/२००९/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१.६.२००९, दि.१६.६.२००९ व दि.२६.५.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.६.७.२००९, दि.४.७.२००९, व दि.४.७.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.६.७.२००९, दि.२४.७.२००९ व दि.२४.७.२००९ |
| ५ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाच्या (जोडपत्र-अ) छायाप्रती सोबत जोडल्या आहेत. | |

**विवेचन**

अपीलकर्ता,श्री.शिवाजी बबनराव खेडकर यांचे प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपिले केली आहेत. आपल्यावर झालेला अन्याय दरम्यानच्या काळात दूर झालेला असल्याने आपली सर्व अपिले निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि.८.१२.२००९ रोजीच्या निवेदनान्वये आयोगास कळविले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. : २२-१२-२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.संपतराव सक्रोजीराव शिंदे
अरण्येश्वर पार्क बी, प्लॉट नं.४९,
अरण्येश्वरमंदिराजवळ, सहकारनगर क्र.१,
पुणे ४११ ००९ **अपीलकर्ता**

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा** अवर सचिव,
महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३४५/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.०६.२००९ |
| ३. | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** - श्री.संपतराव सक्रोजीराव शिंदे<br>अरण्येश्वर पार्क बी, प्लॉट नं.४९,अरण्येश्वरमंदिराजवळ,<br>सहकारनगर क्र.१, पुणे ४११ ००९ | |
| ४ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती- मौजे लोणीकंद, ता.हवेली येथील गट क्र.२८ चे संदर्भात अपील क्र.आरटीएस/II/११४/२००३ तडजोड निकाल दि.११.९.२००३ मध्ये सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राची सत्यप्रत इ. | |

## विवेचन

आरटीएस प्रकरणातील तडजोड निकालात सप्टेंबर १९९३ मध्ये सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत आदी माहिती मुंबईला जाऊन अनेक हेलपाटे घातल्यानंतर सुमारे ३ वर्षांनी मिळाली. त्यामुळे संबंधितांवर दंडात्मक कार्यवाही करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. संपतराव सक्रोजीराव शिंदे यांनी केली.

माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई श्री.चं.अ.विभुते यांनी आयोगाला सादर करावा. असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्यावेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई श्री.चं.अ.विभूते यांनी दि.०९.१२.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला अहवाल सादर केला.

श्री.शिंदे यांनी मागणी केलेली कागदपत्रे मूळ संचिकेसह शासनाकडे पाठविण्यात आली असल्यामुळे माहिती त्यांच्याकडून घ्यावी, असे श्री.शिंदे यांना विहित मुदतीत कळविण्यात आले होते. तसेच महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई यांनाही माहिती देण्याबाबत कळविण्यात आले होते. महसूल व वन विभागाच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत त्यांना शुल्काबाबत कळविले. परंतु शुल्क जमा करण्याचा कोणताही पुरावा त्यांनी सादर न केल्यामुळे माहिती देता आली नाही. दरम्यान श्री.शिंदे यांनी केलेल्या अपिलानंतरही शुल्क भरणा केलेल्या चलनाची प्रत उपलब्ध करुन देण्याबाबत त्यांना कळविण्यात आले. तसेच अपिलीय प्राधिकारी तथा सहसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी दि.०६.०८.२००८ रोजी त्यांना माहिती देण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई श्री.चं.अ.विभुते यांनी अहवालात विस्ताराने नमूद केले आहे. ते लक्षात घेता श्री.शिंदे यांची विलंबाबातची तक्रार अमान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दिनांक : २८/१२/२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

डॉ. जयंत मारोतीराव देशमुख
'मातोश्री', पाटील प्लॉट, डॉ. जानराव
हॉस्पिटल जवळ, बार्शी, जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी**
एम. जी. एम. मेडिकल कॉलेज व
एम. जी. एम. ग्रुप ऑप हॉस्पिटल, नवी मुंबई

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३६३ व १३८६/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.११.२००८ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** डॉ. सौ देशपांडे, डॉ.बोबडे डॉ. गोरे व डॉ. साखरे यांची वैयक्तिक माहिती. | |

**विवेचन**

अपीलकर्ता डॉ जयंत मारोतीराव देशमुख यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या दोन अपिलांसोबत जोडपत्र ब व तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इत्यादी कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(१) अन्वये प्रथम अपील केलेले दिसत नाही. त्यामुळे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलांवर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

वरील दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. २१.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.कल्याणराव दगाजीराव पाटील
टेमकर हाऊस, ओरीएंट पार्क,
साडेसतरा नळी रोड, स्टेडियम समोर,
माळवाडी रोड, हडपसर, पुणे ४११ ०२८ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम), औरंगाबाद **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम), औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३७८/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख (विशेष अपील निर्गत कार्यक्रम) | दि.२१.१०.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री.कल्याणराव दगाजीराव पाटील
टेमकर हाऊस, ओरीएंट पार्क,
साडेसतरा नळी रोड, स्टेडियम समोर,
माळवाडी रोड, हडपसर, पुणे ४११ ०२८

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम),
औरंगाबाद प्रतिनिधी- श्री. बलभीम रामभाऊ देवने

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम),
औरंगाबाद प्रशांत पितांबर सोनवणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१३.०६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२४.०८.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०९.०८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२७.०८.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने त्याच दिवशी सुनावणी घेण्यात आली.

आपल्याला मूळ अर्जानंतर १० महिन्यांनी व अपूर्ण माहिती देण्यात आली. विलंबाची संयुक्तिक कारणे दिली नाहीत. त्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम),औरंगाबाद आणि अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम),औरंगाबाद यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.कल्याणराव दगाजीराव पाटील यांनी केली.

दि.१.०१.१९९९ ते दि.३१.०५.२००७ या काळातील माहिती श्री.पाटील यांनी मागितली असून सुमारे ३५०० पानांची माहिती त्यांना देण्यात आली आहे. एवढी विस्तृत माहिती संकलित करण्यास लागलेल्या अवधीमुळे व संबंधित शाखा अभियंता दीड महिना निवडणुकीच्या कामात कार्यरत असल्यामुळे माहिती विलंबाने देण्यात आली. विलंबाबत श्री.पाटील यांच्याशी वेळोवळी पत्रव्यवहार करण्यात आला होता. तसेच उपलब्ध होईल तशी माहिती त्यांना देण्यात आली होती, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग पश्चिम),औरंगाबाद श्री.प्रशांत पितांबर सोनवणे व अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम),औरंगाबाद श्री.अ.रो.बनसोडे यांचे प्रतिनिधी श्री. बलभीम रामभाऊ देवने यांनी केले. आपल्याला माहिती मिळाली असून तक्रार नसल्याचे पत्र श्री.पाटील यांनी दि.१६.०४.२००८ रोजी दिल्याचे नमूद करुन श्री.सोनवणे यांनी या पत्राची प्रत सादर केली.

उभय बाजूंनी दाखल केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्याने मागितलेली माहिती विस्तृत असून ती संकलित करुन देण्याची कार्यवाही जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम),औरंगाबाद श्री.प्रशांत पितांबर सोनवणे व अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम),औरंगाबाद श्री.अ.रो.बनसोडे यांनी केली आहे. तथापि एका उपविभागातील ही माहिती असून अशा प्रकारचा विलंब योग्य नाही, याची समज जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम),औरंगाबाद श्री.प्रशांत पितांबर सोनवणे अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम),औरंगाबाद श्री.अ.रो.बनसोडे यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दिनांक : ११ /१२/२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. मारुती नागनाथ आदलिंगे — अपीलकर्ता
मु.पो. टेंभूर्णी, पोस्ट ऑफीस मागे,
मा.माढा, जि. सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचीव, श्री संत सावतामाळी शिक्षण प्रसारक मंडळ, इंदापूर, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, कै. विठ्ठलरावजी शिंदे विद्यालय, टेंभूर्णी ता. माढा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३८ + १३९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.५.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** — श्री. मारुती नागनाथ आदलिंगे
मु.पो. टेंभूर्णी, पोस्ट ऑफीस मागे,
मा.माढा, जि. सातारा

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १३८ / सोलापूर | १९.९.२००६ | -- | २३.१२.२००६ | -- |
| १३९ / सोलापूर | १९.९.२००६ | -- | २३.१२.२००६ | -- |

४ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

कै. विठ्ठलरावजी शिंदे विद्यालय, टेंभुर्णी या शाळेच्या मुख्याध्यापक व अपिलीय प्राधिकारी तथा सचीव, श्री संत सावतामाळी शिक्षण प्रसारक मंडळ, इंदापूर यांच्या पातळीवर आपल्या अर्जाची दखल घेतली नाही व कोणतीही माहिती देण्यात आली नाही, त्यामुळे माहिती निःशुल्क मिळावी व जन माहिती

अधिकारी तथा मुख्याध्यापक, शास्ती व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. मारूती नागनाथ आदलिंगे यांनी केली.

राज्य माहिती आयोगाने दि. १९.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'स जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित नव्हते. न्यायालयीन प्रकरणामुळे सुनावणीच्या दिवशी आपण उपस्थित राहू शकत नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कै. विठ्ठलरावजी शिंदे विद्यालय, टेंभुर्णी श्री. राजाराम निवृत्ती देवकर यांनी कळविले.

'महिना संपताच देय माहिती पुढे तहहयात मिळत राहावी,' अशा स्वरूपाची मागणी श्री. आदलिंगे यांनी केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्या त्या वेळी आवश्यक असलेल्या विशिष्ट माहितीसाठी त्यांनी अर्ज करण आवश्यक आहे. तहहयात माहिती मिळावी, अशा स्वरुपाची मागणी करता येणार नाही. तसेच मुद्दा क्रमांक ६,७,९ हे प्रशासकीय कार्यवाहीचे विषय असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये ती 'माहिती' ठरत नाही. ऊर्वरित देय माहिती दिली जाणे आवश्यक आहे.

दि. १.१२.२००८ पर्यंत आपल्याला कोणतीही माहिती मिळाली नसल्याची तक्रार श्री. आदलिंगे यांनी आयोगाकडे दि. १.१२.२००८ च्या पत्रान्वये केली. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून आयोगाने दि. १६.२.२००९ च्या पत्रान्वये खुलासा मागविला, तथापि सदर खुलासा अद्याप अप्राप्त आहे. ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. माहिती देण्याबबात केलेल्या कार्यवाहीचा व आयोगाच्या विचारणेनुसार खुलासा न करण्याबाबतचा खुलासा जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कै. विठ्ठलरावजी शिंदे विद्यालय, टेंभुर्णी व अपिलीय प्राधिकारी तथा सचीव, श्री संत सावतामाळी शिक्षण प्रसारक मंडळ, इंदापूर यांनी दि. १०.१.२०१० पर्यंत न केल्यास संबंधित शास्तीसह अन्य कारवाईस पात्र ठरतील.

पुणे
दि. २२.१२.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**